# विद्यार्थ्यांचे सामजिक कार्यात योगदान म्हणजे राष्ट्र उभारणीत योगदान

■ डॉ. गोस्वामी

**राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयाचे उदघाटन संपन्न**




कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे राष्ट्रीय सेवा योजनाचे सुसज्ज कार्यालयाचे उदघाटन जेष्ठ रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी व नाहाटा महाविद्यालय भुसावळ येथील उपप्राचार्य डॉ.आकोश गोस्वामी यांचे हस्ते दि.12.08 2018 रोजी प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयात संपन्न झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य प्रा. डी.एस.पाटील उपस्थित होते. रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना डॉ. गोस्वामी यांनी विद्यार्थ्यांचे सामजिक कार्यात योगदान म्हणजे राष्ट्र उभारनीत योगदान आहे. समाजातील पिडीत, गरजू, अशिक्षित घटकांना मनापासून मदत करा, सहकार्य करा हेच राष्ट्रिय सेवा योजनेचे ध्येय आहे रासेयो विविध उपक्रमातील सहभाग, स्वयंसेवकाचे कर्तव्य व जबाबदारी प्रत्यक्ष कार्यात विविध कौशल्येजोपासून रासेयो कार्य कसे करावे या बाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.चेतनकुमार शर्मा यांनी केले, तर सूत्रसंचालन कु.अंजली गुडचळ हिने तर निखील पाटील याने आभार मानले. कार्यक्रमास महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.कंचन दमाडे, सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.सावदेकर, डॉ.विनोद चौधरी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयश्री पाटील,अश्विनी पाटील ,अंजली,कृष्णा आदींनी परिश्रम घेतले.

